# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


**८०) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०५.१२.२०२५**

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (२८/११/२०२५ ते ०४/१२/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०६/१२/२०२५ ते १०/१२/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | २९ | ३० | ०१ | ०२ | ०३ | ०४ | दिनांक | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ३१ | ३० | २९ | २९ | २९ |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | १५ | १५ | १६ | १५ | १४ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ० | १ | १ | ० | ० |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७८ | ७२ | ६८ | ६५ | ७१ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४९ | ४५ | ४० | ३९ | ४० |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ९ | ७ | ७ | ७ | ७ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. **तथापि, रात्रीचे तापमान १३° ते १५° च्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. मागील आठवड्यात सुरू झालेली शीतलहर कमी होईल.** |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | **रात्रीचे तापमान १३° ते १५° च्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. मागील आठवड्यात सुरू झालेली शीतलहर कमी होईल.** |
| *रब्बी* पिके | वाढीची अवस्था | **१) तापमान नियंत्रित ठेवण्याकरिता पिकांना रात्रीच्या वेळेस पाणी द्यावे.**<br>**२) थंडीमध्ये पिकाना जमिनीतुन खताची मात्रा देवु नये कारण थंडीमध्ये मुळांची कार्यक्षमता कमी होते त्यामुळे सदरील खते पिकाना उपयोगी पडत नाही.**<br>**३) थंडीमध्ये आंतरमशागतीची कामे टाळावीत जेणे करुन जमिनीतील उष्णता टिकुन राहिल.** |
| हरभरा | वाढीची अवस्था | हरभरा पिकावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी पक्षी थांबे उभारावेत व हेक्टरी ५ या प्रमाणे कामगंध सापळे लावावेत. |
| *रब्बी* ज्वारी | वाढीची अवस्था | जमिनीमधील ६० ते ७० % ओलावा हा बाष्पीभवानामुळे नाहीसा होतो. जमिनीमधील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी शेतामध्ये आच्छादनाचा वापर करावा. आच्छादन हे ज्वारी पेरल्यापासून ५० दिवसांच्या आत करावे. आच्छादनामुळे उत्पादनात १४ % नि वाढ होते. |
| *रब्बी* करडई | वाढीची अवस्था | जमिनीतील ओलावा व अन्नद्रव्यासाठी पिकाची व तणाची परस्पराची स्पर्धा होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| चारा पिके | | रब्बी हंगामात पशुधनाकरीता मका, ओट, बरसीम, लसूण घास, ज्वारी ई. चारा पिकांची पेरणी करावी. |
| द्राक्ष | | द्राक्ष बागेतील किमान तापमान १० अंश से पेक्षा कमी झाल्यास वेलीच्या शरीरशास्त्रीय हालचालींचे संतुलन बिघडते आणि मण्यातील हिरवे रंगद्रव्य गुलाबी रंगात बदलू शकते, याला गुलाबी मणी (पिंक बेरी) म्हणतात. या विकृतीकरीता कोणतेही रासायनिक उपाय अद्याप उपलब्ध नसल्याने घड पेपरने झाकल्यास तापमान नियत्रित राहण्यास मदत होते.<br>तसेच द्राक्ष बागेस रात्रीच्या वेळेस पाणी द्यावे. बोदावर आच्छादन केल्यास मुळांच्या कक्षेतील तापमान वाढण्यास मदत होते. किमान तापमान फारच कमी झाल्याच्या ठिकठिकाणी बागेत शेकोटी व धूर करावा त्यामुळे तापमान नियत्रित राहण्यास मदत होते.<br>शक्य असल्यास बागेभोवती पडदे लावावेत. |
| फळ पिके | | थंडी पासून बचाव करणेकरीता फळ पिकाना संध्याकाळच्या वेळी पाणी द्यावे. थंडी पासून बचाव करणेकरीता फळधारणा झालेल्या फळझाडाची फळे पॉलिथीन/ बारदाणे/ कागदी पिशव्यानी झाकून ठेवावीत. |
| पशुसंवर्धन | | गुरांना रात्रीच्या वेळेस गोठ्यात बांधावे आणि थंडीपासून बचाव करण्यासाठी गोठा स्वच्छ व कोरडा ठेवावा.<br>थंडी पासुन संरक्षण करण्यासाठी निरोगी ठेवण्यासाठी जनावरांच्या आहारात प्रथिने आणि खनिजे यांची मात्रा वाढवा.<br>थंडीमध्ये जनावरांची उर्जेची गरज भागविण्यासाठी नियमितपणे जनावरांना खनिज मिश्रण, मीठ व गव्हाचा भरडा, गूळ इत्यादीचे मिश्रण योग्य प्रमाणे द्यावे.<br>सकाळच्या वेळी जनावरे चरण्यास सोडु नये. |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | रात्रीच्या वेळी जनावरे उघड्यावर बांधू नये. |
| **कुक्कुटपालन** | | पक्ष्याच्या शेडमध्ये कृत्रिम प्रकाश देऊन उष्णता निर्माण करावी. |

**स्त्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : ०५.१२.२०२५

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**